2020-2021



MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

April To June 2021
Issue 38, Vol-05

Date of Publication
01 May 2021

**Editor**
**Dr. Bapu g. Gholap**
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली
नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले

-महात्मा ज्योतीराव फुले

विद्यावार्ता या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायक्षेत्र:बीड

"Printed by: Harshwardhan Publication Pvt.Ltd. Published by Ghodke Archana Rajendra & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor Dr. Gholap Bapu Ganpat.

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

**PRINCIPAL**
**Shivaji College**
**Hingoli.Dist.Hingoli**

**Assistant Professor**
**Shivaji College,Hingoli.**
**Tq.& Dist.Hingoli.(MS.)**

27

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318

Vidyawarta®
Peer-Reviewed International Journal

April To June 2021
Issue-38, Vol-05



# INDEX

01) A Study on Financial Performance of New Generation .......
Dr. Krishna Kumar, Hare Ram Pandit, Bihar || 14

02) Mergers & Acquisitions in Banking Sector: An analysis of......
Prof. (Dr.) Lakshman Singh, Ranjan Kumar, Bihar || 18

03) EFFECTS OF SOME METALLIC POLLUTANTS ON FRESHWATER FISHES
Rifat Rashid, Pragya Shrivastava, Bhopal, India || 24

04) EFFECTS OF MALNUTRITION ON CHILDREN
Shafaqat Farooq, Pragya Shrivastava, Bhopal, India || 33

05) FUNDAMENTAL RIGHT TO PRIVACY: A CRITICAL INSIGHT
SALONI SHARMA, BIKANER, RAJASTHAN || 37

06) AMALGAMATION OF PUBLIC SECTOR BANKS
Shayna Anjum, Chapra (Bihar) || 43

07) A study of quality of the institutional planning process of.....
Prof. Dr. Ranjana Rajesh Sonawane, Jalgaon. || 46

08) Feature Based distance Measurement Approach for Detection,......
Ghuge Vijaymala Tanaji, Jalna. || 49

09) Search for Women's identity in the Novel'The Edible......
Dr. Umesh Vithalrao Kadu, Amravati. || 54

10) Environment and Biodiversity
Dr. D. G. Mhashakhetri, Chamorshi || 56

11) A FAILURE TO REPAY A LOAN BY A BORROWER AND ITS DEEP......
Dr. Kamalakar Baburao Gaikwad, Nampur, Dist-Nashik. || 59

12) A REVIEW PAPER ON THE EMPLOYMENT CRISES IN PUNJAB
Rajanpreet Kaur, Hoshiarpur, Punjab. || 62

13) A Study of Emotional Intelligence on Students
More Tukaram Suryabhanrao, khultabad. || 66

www.vidyawarta.com/03 http://www.printingarea.blogspot.com



PRINCIPAL
Shivaji College
Hingoli.Dist.Hingoli

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

2B

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318

Vidyawarta®
Peer-Reviewed International Journal

April To June 2021
Issue-38, Vol-05



14) ENCOURAGEMENT, CAPACITY AND EFFECT OF LIFE ON ....
Smt. Sonal Sudhakar Patil, Vaijapur ||73

15) कजागतिकीकरणाचे लोककलावंतांच्या जीवनावरील परिणाम : काही निरीक्षणे
डॉ. आर. आर. दिपटे, तुमसर ||76

16) क'कोविंड १९ दरम्यान नागरिकांनी आरोग्यवर्धकतेसाठी केलेल्या उपायांचा अभ्यास''
किरण छगन वाळजे, डॉ. संजय चंद्रशेखर. ||79

17) भारतीय स्त्रियांचा दर्जा
प्रा. वर्षा प्रभाकर गायकवाड वैजापूर ||82

18) 'विकासपुरुष' - वसंतराव नाईक
गिरी निरंजनगिरी गोविंदगिरी, नांदेड ||84

19) नेहरू, गांधी व डॉ. आंबेडकर यांचे लोकशाही व आर्थिक विचार
राजेश कोंडिराम नवघरे, औरंगाबाद ||89

20) हायब्रीड व इलेक्ट्रॉनिक ग्रंथालयातील वाचन साहित्य......
डॉ. पवार जी.आर., हिंगोली. ||92

21) महात्मा गांधीची पत्रकारिता...
भगवान नागोराव सुर्यवंशी, औरंगाबाद ||97

22) सुशासन व्यवस्थेची वैशिष्ट्ये
स्वामी विरभद्र गुरप्पा, नांदेड. ||100

23) महाराष्ट्रातील अंगणवाडी सेविकांच्या आर्थिक व सामाजिक......
डॉ. प्रताप फलफले, सुनिता बनकर, पुणे. ||102

24) गो. ग. आगरकर यांचे धार्मिक व राजकीय विचार
प्रा. नील जनार्धन नागभिडे, उस्मानाबाद ||105

25) कोविड १९ मुळे झालेल्या लॉकडाउनच्या काळातील कौटुंबिक.....
डॉ. कुसुम विजयकुमार चौधरी, चेंबुर, मुंबई ||108

26) भंडारा जिल्हयातील पिकाखालील क्षेत्र व उत्पादन....
प्रा. डॉ. श्रावण ब. कापगते, साकोली ||112



PRINCIPAL
Shivaji College
Hingoli.Dist.Hingoli

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

29

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318 | Vidyawarta® Peer-Reviewed International Journal | April To June 2021 Issue-38, Vol-05 | 092

Shivaji College Hingoli Dist Hingoli

20

# हायब्रीड व इलेक्ट्रॉनिक ग्रंथालयातील वाचन साहित्य संग्रहाचा विकास व व्यवस्थापन

डॉ. पवार जी.आर.
ग्रंथपाल,
शिवाजी महाविद्यालय, हिंगोली

**********

सार

प्रस्तुत शोध निबंधामध्ये वाचनसाहित्य संग्रहाचा विकास आणि त्याचे व्यवस्थापन, हायब्रीय ग्रंथालयातील पारंपारिक साधनाबरोबरच डिजिटल स्वरूपातील वाचनसाहित्य, इलेक्ट्रॉनिक वाचनसाहित्य संग्रहाचा विकास आणि व्यवस्थापनाबाबत विवेचन करण्यात आले आहे. तसेच ई—संसाधनांची ग्रंथालयातील गरज, ई—संसाधनांबाबत धोरण ठरवताना लक्षात घ्यावयाच्या बाबी, ग्रंथालयातील इलेक्ट्रॉनिक संसाधनांचे व्यवस्थापन आणि इलेक्ट्रॉनिक व डायब्रीड ग्रंथालयाच्या व्यवस्थापनाचे घटक इ. बाबत विवेचन करण्यात आले आहे.

**प्रस्तावना**

वाचन साहित्य वाचक. ग्रंथालय सेवक, ग्रंथालय इमारत आणि उपकरणे हे ग्रंथालयाचे महत्वाचे घटक आहेत. ग्रंथालयाच्यावरील घटकापैकी वाचनसाहित्य या घटकास विशेष महत्व आहेपारंपारिक ग्रंथालयाचे स्वरूप बदलून आता त्यास आधुनिक ग्रंथालयाचे स्वरूप येऊ लागले आहे. माहितीच्या परिस्फोटामध्ये वेगवेगळ्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात माहितीची निर्मिती होत आहे. त्याबरोबरच माहितीतंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणात विकास होत गेला. १९८० मध्ये ग्रंथालयात संगणकांचा प्रवेश झाला. संगणकाच्या वापरामुळे माहिती शोधण्याचे काम सोपे झाले सेवा दर्जेदार झाल्याइंटरनेटच्या प्रवेशामुळे हवी असलेली माहिती विविध वेबसाईटस्च्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर मिळू लागली. त्यानंतर ई—प्रकाशने यांचे प्रमाण वाढले याचा परिणाम म्हणून पारंपारिक ग्रंथालयाचे रूपांतर हळुहळु हायब्रीड ग्रंथालय, इलेक्ट्रॉनिक ग्रंथालय, डिजीटल ग्रंथालयामध्ये होऊ लागते. या तीनही ग्रंथालयातील समान धागा म्हणजे येथील वाचनसाहित्य इलेक्ट्रॉनिक स्वरूपात साठवुन ठेवत असतेग्रंथालयात पारंपारिक साहित्यासोबतच इलेक्ट्रॉनिक माध्यमाचा होणारा समावेश म्हणजे ही ग्रंथालये केवळ पारंपारिक न राहता हायब्रीड ग्रंथालये बनु लागली आहेत ई—वाचनसाहित्याचे प्रकाशन मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यामध्ये ई—नियतकालीके, ई—बुक्स, ई—मेल, सी.डी. रॉम, इंटरनेट इ. माध्यमां मध्ये संग्रहीत केलेल्या ई—वाचनसाहित्याची ग्रंथालये ही ई—ग्रंथालये म्हणजेच इलेक्ट्रॉनिक ग्रंथालय असे म्हणतात

**हायब्रीड ग्रंथालय**

हायब्रीड ग्रंथालय ही संकल्पना १९९० पासून ग्रंथालय व माहितीशास्त्रामध्ये येत आहेहाय ब्रीड ग्रंथालये म्हणजे पारंपारिक ग्रंथालय ते डिजिटल ग्रंथालय या दरम्यानच्या काळास हायब्रीड ग्रंथालय म्हणतात. हायब्रीड ग्रंथालय ही संकल्पना ग्रंथपालाद्वारे वापरली जाऊ लागली कारण ग्रंथालयात पारंपारिक मुद्रित साहित्याबरोबरच वाढत्या प्रमाणावरील इलेक्ट्रॉनिक साधनांचा देखील समावेश होऊ लागला. हायब्रीड ग्रंथालयात पारंपारिक साहित्य जसे ग्रंथ, नियतकालिके, पेटंट, व्यापारी, वाड्:मय याबरोबरच ई—पुस्तके, ई—नियतकालिके, संगणकीय माहिती साठविणे, मायक्रोफॉर्म स्वरूपातील साहित्य, सीडी रोम, ध्वनिफिती इ. इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील वाचनसाहित्याचा समावेश होता अशा प्रकारे हायब्रीड ग्रंथालये ही पारंपारिक तसेच वाढत्या स्वरूपातील इलेक्ट्रॉनिक साधनांचे संक्षिप्त स्वरूप होय. पारंपारिक ग्रंथालये आणि संपूर्ण आंकीय ग्रंथालये याच्या मधली अवस्था म्हणजे हायब्रीड, ग्रंथालय हायब्रीड ग्रंथालये म्हणजे नजीकच्या भविष्यकाळातील एक आदर्श नमुना आहे की संपूर्ण आंकीय ग्रंथालयाच्या दिशेने जाणारी संक्रमण अवस्थेतील ग्रंथालय आहेत

**ई—ग्रंथालय**

इलेक्ट्रॉनिक ग्रंथालय ही संकल्पना माहिती तंत्रज्ञानाच्या विकासातुन निर्माण झाली. आज संपूर्ण ग्रंथालय क्षेत्र माहिती आणि तंत्रज्ञानाच्या भोवती फिरत



PRINCIPAL
Shivaji College Hingoli
Assistant Professor
Shivaji College,Hingoli.

30

Shivaji College



आहे, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. सध्याचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे युग असल्याने साहाजिक इलेक्ट्रॉनिक संसाधनांचा वापरही जनतेकडुन होत आहे. इलेक्ट्रॉनिक ग्रंथालयात माहिती ही इलेक्ट्रॉनिक अथवा डिजीटल पध्दतीने संग्रहीत केली जातेइतर स्वरूपापेक्षा इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील माहिती कधीही आणि कोठेही उपलब्ध होऊ शकतेइलेक्ट्रॉनिक संसाधनामध्ये ई—पुस्तके, ई—जर्नल्स, ऑनलाईन इंटरनेट ॲक्सेस, सीडी रॉम डेटाबेसेस, ई—बुक्स, ई—जर्नल्स इतर साहित्य आज बहुतांश माहिती ही इलेक्ट्रॉनिक अथवा डिजीटल पध्दतीने संग्रहीत केली जात आहे. शब्दकोश, विश्वकोश इ. साहित्य हे आज आपल्याला सीडी रॉम आणि इंटरनेटवर उपलब्ध आहे. छापील अथवा इतर स्वरूपापेक्षा इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील माहिती कधीही आणि कोठेही उपलब्ध होऊ शकते. मात्र इलेक्ट्रॉनिक संसाधनांची खरेदी करताना त्यातील समाविष्ट घटक जोडणी, तांत्रिक आधार किंमत आणि वैधानिक बाबीची पूर्तता या विषयी सविस्तर माहिती असणे आवश्यक आहे

**वाचनसाहित्य संग्रह विकास**

ग्रंथालयाकडे असलेल्या वाचनसाहित्यामध्ये योग्य अशा नवीन वाचनसाहित्याची भर घालणे आणि ग्रंथालयातील अनावश्यक वाचनसाहित्य काढुन टाकणे म्हणजेच वाचनसाहित्य संग्रहाचा विकास करणे होय. ग्रंथालयासाठी वाचनसाहित्याची निवड करून ती उपार्जित करण्याची प्रक्रिया म्हणजे वाचनसाहित्य संग्रह विकास होय.

**ई—संसाधनांची ग्रंथालयातील गरज**

**१. वाचकांची वाढती मागणी**

वाचकाच्या माहिती विषयक काढलेल्या गरजा आणि कमीत कमी वेळेमध्ये जास्तीत जास्त चांगल्या प्रकारे सुविधा देण्यासाठी ई—संसाधने ग्रंथालयामध्ये असणे गरजेचे आहे, तसेच विद्यापीठ आणि महाविद्यालयांमध्ये संशोधनास प्रोत्साहन दिले जात असल्याने आता विद्यापीठात आणि महाविद्यालयात ग्रंथालयांमध्ये ई—संसाधने वापरणे आवश्यक बनले आहे.

**२. जागेची कमतरता**

छपाई माध्यमातील संसाधनांच्या संग्रहासाठी जास्त जागा लागते. त्यामानाने इलेक्ट्रॉनिक संसाधनांच्या सहाय्याने खुप मोठी माहिती अत्यंत कमी जागेमध्ये संग्रह करणे शक्य होते.

**३. वापरातील बहुविधता**

एकच दस्तऐवज, परिशिष्ट ई. कागदपत्रे एकाच वेळेस अनेक ठिकाणी एकाच वेळी किंवा केव्हाही वापरू शकतो.

**४. शोध पध्दत**

इंटरनेटवर सर्चबारच्या माध्यमातून हवी ती माहिती तातडीने सहजरीत्या शोधता येते.

**५. आशय :**

छपाई केलेल्या ग्रंथामध्ये समाविष्ट ज्ञानास मर्यादा पडतात मात्र सीडी मध्ये अथवा इंटरनेटवर भरपूर माहिती मल्टीमीडिया इफेक्टसह उपलब्ध आहे.

**६. पुन :वापर :**

ई—संसाधनांच्या वापरामार्फत सहजरीत्या माहिती पाहिजे त्यावेळी पुन: प्राप्ती होऊ शकते.

**७. जागतीक जोडणी :**

इंटरनेटच्या माध्यमातुन जागतिक स्तरावरील माहिती आपल्या वाचकांना ग्रंथालये पुरवु शकतात त्यामुळे वाचकांची माहिती विषयक गरज भागतेवरील सर्व कारणांसाठी ई—संसाधनांचा ग्रंथालयामध्ये समावेश असणे गरजेचे आहे. माहितीच्या परिस्फोटाच्या युगामध्ये ई—संसाधनाचा ग्रंथालयातील उपयोग ही बाब अपरिहार्य बनली आहेग्रंथालयातील संसाधनांचे ढोबळरीतीने पुढील दोन प्रकार पाडता येतील. १. पारंपारिक माहिती साधने २. इलेक्ट्रॉनिक माध्यमातुन प्रकाशित होणारे साहित्य वाचनसाहित्य संग्रहाचा विकास म्हणजे वाचकांच्या चालु गरजा आणि भविष्यकालीन मागणी त्यांचा विचार करून वाचनसाहित्य संग्रहे विकासाच्या धोरणाच्या चौकटीत बसेल त्याप्रमाणे वाचनसाहित्याची निवड व उपार्जन करणे होय.

**वाचनसाहित्य संग्रह विकासाची ध्येय धोरणे**

वाचनसाहित्य संग्रहाचा विकास करीत असताना काही उदिष्ट्ये, हेतू, ध्येयधोरणे यांचे नियोजन करणे आवश्यक आहे. केवळ वाचनसाहित्याची निवड किंवा उपार्जन न करता उपयुक्तेच्या दृष्टीकोनातुन त्याचे मुल्यमापन करणेही आवश्यक ठरते. हायब्रीड ग्रंथालयात पारंपारिक साधने जसे ग्रंथ, हस्तलिखित अहवाल असे



PRINCIPAL
Shivaji College

31

मुद्रित साहित्याबरोबरच अमुद्रीत साहित्याचा समावेश होतो. तर इलेक्ट्रॉनिक ग्रंथालयात फक्त इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील वाचनसाहित्य असते. जसे ई—बुक, ई—जर्नल्स, सीडी रॉम इ. अशा वाचनसाहित्य संग्रहाचा विकास विषयक धोरण ठरवताना खालील बाबी विचारात घेण आवश्यक आहे.

१. पालकसंस्थेची ध्येय धोरणे.

२. वाचकांची गरज

३. साधनांची आणि पायाभुत सुविधांची उपलब्धता

**१. पालकसंस्थेची ध्येय धोरणे**

प्रत्येक ग्रंथालयाच्या वाचनसाहित्य संग्रहाचा विकास करत असताना त्या ग्रंथालयाच्या पतसंस्थेची ध्येयधोरणे विचारात घेतली पाहिजेत.

**२. वाचकांची गरजा**

प्रत्येक ग्रंथालयाने आपला वाचक वर्ग कोणत्या स्वरूपाचा आहे त्याचा विचार करून सर्व वाचकांच्या गरजांची पुर्तता करू शकेल असे उपयुक्त व समतोल वाचनसाहित्य संग्रह विकसित करणारे धारे ण ठरवाव.

**३. साधनांची आणि पायभुत सुविधांची उपलब्धता :**

ग्रंथालयाची आर्थिक साधने, मनुष्यबळ तसेच वाचनसाहित्य संग्रहाचे व्यवस्थापन, ग्रंथालय इमारत, माहिती साधने इ. पायाभुत सुविधा विचारात घेऊन वाचन—साहित्य संग्रह विकासाचे धोरण ठरवावे.

**इलेक्ट्रॉनिक वाचनसाहित्य घेताना घ्यावयाची काळजी**

हायब्रीड ग्रंथालयात पारंपारिक मुद्रित साहित्याबरोबरच मुद्रित वाचनसाहित्याचा समावेश असतो तर इलेक्ट्रॉनिक ग्रंथालयात फक्त इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील वाचनसाहित्य असते. त्यामुळे इलेक्ट्रॉनिक वाचनसाहित्य विकासाचे धोरण ठरवताना खालील प्रमाणे काळजी घेणे आवश्यक आहे.

१. इलेक्ट्रॉनिक संसाधनाच्या विश्वसार्हतेची पडताळणी योग्य रितीने करावी

२. सर्व सामावेशकता असावी.

३. इंटरनेट आवृत्ती ही परिपूर्ण असावी. वाचकांच्या गरजा भागवणारे असावी.

४. वाचकांना उपयुक्त विषयांशी सुसंगत असावी.

५. हाताळण्यास अत्यंत सोपे.

६. किंमत आणि स्वामित्वाचा डबक अबाधित राखता यावा

७. संगणकाच्या हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर मध्ये जास्त बदल न करता माहिती मिळावी.

**१. आर्थिक अंदाजपत्रक**

कोणतेही ग्रंथालय असो वाचनसाहित्य संग्रह खरेदी करण्यासाठी ग्रंथालयाच्या अंदाजपत्रकात तशी आर्थिक तरतुद करून घेणे आवश्यक असते. हायब्रीड ग्रंथालयात ग्रंथाबरोबर ई—साहित्याचा समावेश असतो तर इलेक्ट्रॉनिक ग्रंथालयात फक्त इलेक्ट्रॉनिक साहित्य असते. इलेक्ट्रॉनिक संसाधनांची केवळ एकदा खरेदी करून भागेल असे नाही तर ती माहिती वापरण्यासाठी, पाहण्यासाठी लागणारे उपयुक्त तंत्रज्ञान तसेच ती माहिती विशिष्ट कालावधीनंतर अद्यावत करून घेणे गरजेचे असते. त्यासाठी ग्रंथपालांना आर्थिक अंदाजपत्रक वेळोवेळी बदलून योग्य तरतुद करावी लागते.

**२. उत्पादनाचा दर्जा**

हायब्रीड ग्रंथालयात ग्रंथ व अमुद्रीत ग्रंथेत्तर साहित्य खरेदी करतांना त्या साहित्याचा दर्जा पाहणे गरजेचे असते. तसेच इलेक्ट्रॉनिक संसाधनांचा खरेदी करतांना त्यांच्या दर्जा पाहुणच खरेदी केले पाहिजे. आजकाल सर्वांनाच अतिशय जलद माहिती हवी असते. आणि इंटरनेट सर्वात वेगवान माध्यम असल्यामुळे त्याकडे सर्वांचा ओढा असतो. ब—यात इंटरनेटववर उपलब्ध असणारी माहिती सुध्दा तंतोतंत खरी आहे त्याबाबत कोणीही खात्री देऊ शकत नाही.

**३. तंत्रज्ञानाची कालबाह्यता**

तंत्रज्ञानातील उत्क्रांतीचा हा एक परिणाम आहे की ज्यामुळे नवीन तंत्रज्ञान विकसित झाल्यावर जुन तंत्रज्ञान फारसे हार्डवेअर मध्ये वेळोवेळी बदल होत आहेत. नवनविन आज्ञावली अस्तीत्वात येत आहेत त्यामुळे आपला संगणक सतत अद्यावत करणे गरजेचे आहे.

**४. अधिकार करार**

बरेचसे प्रकाशक इलेक्ट्रॉनिक स्वरूपात असलेली माहिती देताना काही करार करतात. ते



PRINCIPAL
Shivaji College

32

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318

Vidyawarta®
Peer-Reviewed International Journal

April To June 2021
Issue-38, Vol-05


घेणे गरजेचे असते. असे उत्पादन खरेदी करण्यापूर्वी त्या कराराची अभ्यास करणे आवश्यक आहे.

५. स्वामित्व हक्क :

आंतरराष्ट्रीय ठरावानुसार बौध्दिक हक्कामध्ये कॉपीराईट व महत्वाचा असुन लेखकाने प्रकाशित केलेल्या तारखेपासून व हयैतीनंतर ६० वर्ष अशा अधिकारांचा अंत असतो. या कालावधीनंतर असे पुस्तक सार्वजनिक वापरासाठी मुक्त होते. आंकीय रूपांतरासाठी अशी ग्रंथसंपदाच फक्त विचारात घेता येते किंवा पूर्वपरवानगीसह ग्रंथाचा विचार करता येतो. इलेक्ट्रॉनिक प्रकाशनामध्ये दिवसेंदिवस अतिशय वेगाने बदल होत आहेत. सध्या अस्तित्वात असलेल्या स्वामित्व हक्क कायद्यांच्या चौकटीत कसे बसवता येतील हे अद्याप अस्पष्ट आहे. शैक्षणिक व संशोधनात्मक कार्यासी काही माहिती वापरली जाण्यास हरकत नाही परंतु काही ग्रंथालये विनाकरण यावर बंधने घालतात.

६. मानवी संसाधन

ग्रंथालयातील कर्मचा—यांना अद्यावत तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देणे तसेच नवनविन कौशल्यांचा स्वत:मध्ये विकास करून घेण्यासाठी प्रवशत्त करणे गरजेचे आहे७.

माहितीचे स्थानांतर

तंत्रज्ञानाच्या कालबाह्यतेमुळे एखाद्या जुन्या प्रणालीवरील असलेली माहिती काही वेळा नष्ट होण्याचा धोका असतो. त्यावर उपाय म्हणून सतत काही विशिष्ट कालावधीनंतर माहितीचे स्थलांतर अद्यावत अशा तांत्रिक प्रणालीमध्ये करून घेणे गरजेचे असते.

८. मालकी


इलेक्ट्रॉनिक माहितीचे प्रकाशक ब—याचदा ग्रंथालयांना ती माहिती जतन करून ठेवण्याचे किंवा उतरवुन घेण्याचे हक्क देत नाहीत. त्यामुळे इलेक्ट्रॉनिक माध्यमातील मालकीपासून ग्रंथालये वंचित राहतात.

९. इलेक्ट्रॉनिक संसाधनांमध्ये माहितीचे जतन

इलेक्ट्रॉनिक माहितीचे जतन करणे अत्यंत सोपे आहे तसेच यामधील हवी ती माहिती केव्हाही प्रतीप्राप्त करणे शक्य होते मात्र संगणकामध्ये कोणताही विषाणु प्रवेश केल्यास साठवलेली माहिती निरूपयोगी होण्याचा धोका संभावतो

**हायब्रीड व इलेक्ट्रॉनिक वाचन साहित्य संसाधनाच्या व्यवस्थापन प्रकियेतील घटक**

हायब्रीड व इलेक्ट्रॉनिक ग्रंथालयातील वाचन साहित्य संसाधनाच्या व्यवस्थापन प्रकियेत पुढील चार घटकांचा समावेश होतो.




१. संकलन

आंकीय माहिती संसाधनाचे प्रभाव स्वरूपा मध्ये संकलन हे शिक्षण संशोधन आणि निर्णय प्रक्रियेसाठी माहिती पुरविण्यामध्ये अत्यंत उपयुक्त ठरते. आंकीय स्वरूपातील माहिती सेवा देण्यासाठी आंकीय संसाधनाचे संकलनही एक प्राथमिक पायरी आहे. माहिती तातडीने उपलब्ध होण्याच्या दृष्टीकोनातून करण्यात येणा—या इतर प्रक्रिया म्हणजे आंकीय स्वरूपातील माहिती सेवा देण्यातील दुसरा टप्पा होय. माहिती प्रतीप्राप्तीसाठी इलेक्ट्रॉनिक संसाधनांचा उपयोग करणा—या लोकांसाठी आंकीय स्वरूपातील माहिती संकलन करणे ही एक सर्वसमावेशक अशी प्रक्रिया असल्याचे अशा संसाधनांचा विकास करणे आवश्यक आहे.

२. प्रक्रिया

हे एक तांत्रिक कार्य असुन प्रत्येक ग्रंथालयाने वाचकांचा वेळ वाचविण्यासाठी उपलब्ध असलेल्या संसाधनांविषयी माहिती मिळविणे सोपे जाते. संसाधनांच्या विषयानुसार प्रकारानुसार त्यातील समाविष्ट घटकानुसार त्यांचे वर्गीकरण केले जाते. तसेच या प्रकियेमुळे बिब्लीओग्राफीक डाटा तयार करणे शक्य आहे. तसेच वाचकांना ताबडतोब माहिती मिळण्यासाठी कोणत्या वेबसाईटवर (संकेत स्थळावर) कोणत्या प्रकारची माहिती उपलब्ध आहे. या बाबतही माहितीची नोंद ठेवल्यास सोईचे होईल.

३. संग्रहण

आंकीय स्वरूपातील माहिती संसाधने ही प्रक्रिया तसेच सतत उपयोगात आणले जाणारे साहित्य असल्यामुळे त्यांचे संग्रहण अतिशय काळजीपुर्वक



PRINCIPAL
Shivaji College
Hingoli.Dist.Hingoli

33

College Hingoli Dist. Hingoli

मध्ये आवश्यक असते जर असे नाही झाले, तर त्या संसाधनाचा ही वाचन साहित्य संसाधन वेळोवेळी अद्यावत करून घेणे आवश्यक आहेतसेच ही संसाधने नियमितपणे वापरली गेली पाहिजेत तसेच सीडी या न वापरल्या गेल्यास साडेतीन वर्षाच्या कालावधीनंतर त्यावरील समाविष्ट माहिती नष्ट होण्याची भिती असते.

**४. माहिती प्रसार आणि पुन:प्राप्ती**

माहिती ही छापील किंवा आंकीय स्वरूपा मध्ये उपलब्ध आहे. आंकीय स्वरूपातील माहिती संसाधनातील माहिती ही इलेक्ट्रॉनिक उपकरणांद्वारे इच्छित स्थळी पोहचविली जाते. या पध्दतीमध्ये माध्यमे व त्यांना जोडणारे दुवे अतिशय महत्वाचे ठरतात. माहिती पुन: प्राप्ती पध्दती ही वाचक व उपलब्ध माहिती साधने यामधील दुवा म्हणुन कार्य करते. अनिश्चितता टाळण्यासाठी ज्ञान व ज्ञानासाठी माहिती मिळविणे आवश्यक आहे. म्हणुन सैध्दांतिक स्वरूपातील माहिती प्रसारीत होणे गरजेचे आहेकोणत्याही संकिय माहिती केंद्राचे कार्य पुढील दोन गोष्टींवर अवलंबुन असते.

१. विषयमुल्यांनुसार माहितीची रचना करणे.

२. वाचकांना अद्ययावत प्रकाशित साहित्याविषयी माहिती देणे माहितीच्या प्रसारणामुळे वाचकांना त्यांच्याशी संबंधित विषयामध्ये अद्यावत माहिती मिळणे.

**सारांश**

अशाप्रकारे ग्रंथालयातील वाचन साहित्य संग्रहाचा विकास ही एक संस्थेची ध्येय, व्याप्ती, उद्दिष्टे आणि कार्यक्रम यांच्या आधारावर नियोजीत केलेली निर्णय प्रकिया असुन हायब्रीड ग्रंथालय व इलेक्ट्रॉनिक ग्रंथालयातील वाचन साहित्य व्यवस्थापन करताना भविष्य काळातील तंत्रज्ञानाच्या विकासाचा वेध घेणे अत्यंत आवश्यक आहे

**संदर्भ सूची**


१. कुंभार, राजेंद्र. (२०००). महाविद्यालयीन व विद्यापीठीय ग्रंथालये नाशिक.

२. फडके, द.ना. (२००७). ग्रंथालय संगणकीकरन आणि आधुनिकीकरण, पुणे : युनिव्हर्सल प्रकाशन.

३. A vasia. Maya. (March, 2001). Electronic Resources Collectiondevelopment, Ahmedabad : INF LIBNT centre.

4- Ramesh, L. S. R. - Library Collection Management and preservetion of digital resources - an end to age old practice in Indian Librarian, Hydrabad : Acharya N.G. Ranga Agrial University.

5- Kumar, P.S.G. (2002). A Student Manual of Library and information Science, Delhi : B.R. Publishing Corporation.

6- Shrikumar, M.G. & Others (2005). : Digital Libraries in Knowledge processing, New Delhi : Ess Publications.

7- Borse, T.R. (2006). : Digital Information Resources Management, IASLIC Bulletin.

8- Jalol, Samir Kumar. (March, 2001). : Electronic Book : A kind of Digital Resource, Ahmedabad : INFLIBNET Center.

9- Mohapatra, Mahhulagna & Tarikar Jyoti. (2005-06). : How to Build a Digital Library, Khagpur : Indian Institute of Technology.

10- Parekh, Harsha : Digitization. (March, 2001) . An Overview of Issues, : Ahmedabad. INFLIBNAT Center.

११. नरगुंदे, रेवती. (२०१३). ग्रंथालय आणि सामाजिक विकास, पुणे : युनिव्हर्सल प्रकाशन.

१२. फडके, द. ना. (२०१५). ग्रंथालय संगणकीकरण आणि आधुनिकरण, पुणे : युनिव्हर्सल प्रकाशन.

१३. जोशी, प्र. न. (१९७०). आदर्श मराठी शब्दकोश, पुणे : विदर्भ मराठवाडा बुक्स


□□□



PRINCIPAL
Shivaji College

Assistant Professor
Shivaji College, Hingoli.
Ta & Dist Hingoli (MS)